दाखल तारीख – १२.०९.२०२५
नोंदणी तारीख – १२.०९.२०२५
निकाल तारीख – ०८.०६.२०२६
कालावधी – वर्षे : महिने : दिवस
०० : ०८ : २७

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुडाळ यांचे न्यायालयात**
**ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग**

(पिठासीन अधिकारी – जी.ए.कुलकर्णी)
(अधिघोषित दिनांक ०८.०६.२०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४२०/२०२५**
**निशाणी क्र.६ लगत**

प्रथम खबर अहवाल क्रमांक–७०/२०२५
निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक सिंधुदुर्ग.

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,भरारी पथक सिंधुदुर्ग. |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | श्रीम.ए.डी.मिरजे |
| | **विरुध्द** |
| आरोपी | मनवेल आंतोन परेरा<br>वय–३८ वर्षे, धंदा–शेती<br>रा.महादेवाचे केरवडे क नारूर खिरमळावाडी<br>घर नं. २३०, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री.एस.एस.राऊळ |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०३.०४.२०२५ |
| गुन्हा दाखल दिनांक | ०३.०४.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १२.०९.२०२५ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | २७.११.२०२५ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | १७.०२.२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | ---- |
| न्यायनिर्णय दिनांक | ०८.०६.२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | निरंक |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर मुक्त केल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | आरोपीस सुनाविण्यात आलेली शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४६८ करिता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मनवेल आंतोन परेरा | बी.एन.एस.एस. कलम ३५ (३) प्रमाणे नोटीस | २७/११/२०२५ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**-:: न्यायनिर्णय ::-**

**(दिनांक ०८.०६.२०२६ रोजी घोषीत)**

साक्षीदारांचे जाब जबाब आणि प्रकरणाचा अभिलेख पहाता, सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात. सदर मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, दि.०३.०४.२०२५ वाजणेच्या सुमारास गाव मौजे | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | महादेवाचे केरवडे, क नारूर, खिरमळावाडी ता.कुडाळ येथे आरोपी घर नं. २३० व आजूबाजूच्या परिसरात महाराष्ट्र दारूबंदी गुन्हयाअंतर्गत छापा टाकला असता, तेथे आरोपी एका कापडी पिशवीमध्ये गोवा बनावटी दारूचे किंगफिशर स्ट्रॉन्ग बिअर असे लेबल असलेले दारूने भरलेले ५०० मिली मापाच्या एकुण २१ सिलबंद पत्र्याचे टिन अशी बेकायदेशीर दारु विक्री करणेच्या उद्देशाने विनापरवाना कब्जात बाळगलेल्या स्थितीत आढळून आला ? | |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**–:: कारणमिमांसा ::–**

२. याकामी अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप शाबीत करणेकरिता खालीलप्रमाणे दोन साक्षीदार तपासले.

**अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | गुरूप्रसाद बाळकृष्ण नाईक | पंच साक्षीदार |
| २. | दिपक रामचंद्र वायदंडे | ऋषिकेश विलास शेटगे |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ) अभियोग पक्ष :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | निशाणी पी–१ | फिर्याद |

**ब) बचाव पक्ष :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क ) न्यायालयीन निशाणी :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड) मुद्देमाल तपशील :–**

| **अनु.क्र.** | **मुद्देमाल क्रमांक** | **मुद्देमालाचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**३.** आरोपीने त्याचे बचावासाठी स्वत:ची अगर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली नाही अगर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. आरोपीविरुध्द पुरावा समोर आल्याने आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ (१) (ब) प्रमाणे जबाब नोंदविण्यात आलेला आहे.

**४.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्रमांक १ करिताः–</u>**

**५.** अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ हे जप्ती पंचनामेवरील पंच साक्षीदार असून, त्यांनी त्यांचे सरतपासामध्ये ' दि.०३.०४.२०२५ रोजी ते कोठेही गेले नव्हते. त्यादिवशी त्यांचेसमक्ष काही घडले

नाही. त्यांना पंचनाम्याकरिता पोलिसांनी बोलाविले नव्हते. त्याचेसमक्ष कोणताही पंचनामा तसेच काही जप्त करणेत आलेले नाही. त्यांनी केवळ एका कागदावर सही केलेली होती. जप्ती पंचनाम्यावर अनु.क्र.२ वर त्यांची सही आहे. परंतु त्यातील मजकुराबाबत त्यांना काही माहिती नाही'असा मजकुर कथन केलेला आहे. सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुत साक्षीदारास उलटतपास स्वरुपातील प्रश्न विचारुन जप्ती पंचनामा सिध्द करणेचा पुरेपुर प्रयत्न केला. तथापि, प्रस्तुत साक्षीदाराने जप्ती पंचनामा सिध्द होईल या आशयाची कोणतीही बाब या न्यायालयासमक्ष कथन अथवा मान्य केलेली नाही.

६. अभियोगपक्ष साक्षीदार क्र. ०२ हे फिर्यादी असून त्यांनी त्यांचे सरतपासामध्ये 'निशाणी पी१/पीडब्ल्यू२ लगत दाखल असणाऱ्या फिर्याद जबाब अनुषंगे मजकूर कथन केलेला आहे. प्रस्तुत साक्षीदाराने त्याचे उलटतपासामध्ये कुडाळ ते घटनास्थळ या दरम्यान साधारण एक तासाचे अंतर आहे. घटनास्थळाशेजारी राहती घरे असून वर्दळीचे ठिकाण आहे. प्रस्तुत प्रकरणातील पंचांनी बऱ्याच केसेसमध्ये पंच म्हणून काम पाहिले आहे. त्यांना स्थानिक पंच उपलब्ध होवू शकले असते. जप्त मुद्देमाल न्यायालयासमक्ष नाही या बाबी मान्य केलेल्या आहेत. प्रस्तुत साक्षीदाराच्या कथनांबाबत साशंकता निर्माण होईल अशी कोणतीही बाब अभियोगपक्षाने न्यायालयासमक्ष सादर केलेली नाही. तथापि, प्रस्तुत साक्षीदार हा पंचाच्या उपस्थितीमध्ये आरोपीच्या ताब्यातून दारुचा मुद्देमाल जप्त करणेत आला असे कथन करीत आहे, याउलट अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेल्या पंच साक्षीदार हे प्रस्तुत साक्षीदाराच्या कथनास विरोधाभास निर्माण होईल अशी कथने करत आहे.

७. प्रस्तुत साक्षीदाराने निशाणी क्र.पी१/पीडब्ल्यू२ लगत दाखल असणाऱ्या फिर्याद जबाबास पुरक होईल अशा स्वरुपाची कथने न्यायालयासमक्ष केलेली असली तरीदेखील या कथनास दुजोरा देवू शकेल असा कोणताही साक्षीदार अभियोगपक्षाच्या वतीने तपासणेत आलेला नाही. अभियोगपक्षाने सदर गुन्हयाचे कामी तथाकथित जप्त केलेला कोणताही मुद्देमाल न्यायालयासमक्ष दाखल

केलेला नाही. यावरुन सदर साक्षीदाराची कथने ही विश्वसनीय वाटत नाहीत. सबब, प्रस्तुत साक्षीदाराच्या सदर कथनांबाबत साशंकता निर्माण होत आहे.

८. अभियोग पक्षास वेळोवेळी संधी देवुन देखील अभियोग पक्षाने तपासी अधिकारी व अन्य साक्षीदार यांना तपासलेले नाही. तसेच, तथाकथित जप्त मुद्देमाल या न्यायालयासमक्ष सादर करणेत आलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये केवळ आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करणेत आले म्हणुन अभियोग पक्षाने गुन्हा शाबीत केला असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे आरोपीने गुन्हा केलेचे निष्पन्न होणेकरीता अभियोग पक्षाने घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करणे अत्यंत जरुरीचे आहे. तथापि, प्रस्तुतकामी अभियोग पक्षाने घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करणेकरीता कोणतेही प्रयत्न केलेचे दिसून येत नाही. तसेच अभियोग पक्षाने जप्त केलेला मुद्देमाल व रासायनिक पृथःक्करण अहवाल न्यायालयासमक्ष सादर केलेला नाही.

एकंदरीत अभिलेखावरील सर्व पुरावा विचारात घेता, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवणेत आलेले आरोप हे निःसंशयपणे सिध्द केलेले दिसून येत नाही. सबब मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष *'**नकारार्थी**'* नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करीताः</u>–**

९. मुद्दा क्रमांक २ चे निष्कर्षा करिता मी खालील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी मनवेल आंतोन परेरा वय–३८ वर्षे, रा.महादेवाचे केरवडे क नारूर, खिरमळावाडी घर नं. २३० ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी रक्कम रु.१५,०००/– रुपयांचे बंधपत्र व जामीनदारांचे जामीनखत सातदिवसांचे आत सादर करावे.

४. निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक सिंधुदुर्ग यांना याद्वारे निर्देशीत करणेत येते की, याकामी जप्त असलेला मुद्देमाल म्हणजेच गोवा बनावटी दारूचे किंगफिशर स्ट्रॉन्ग बिअरचे ५०० मिली मापाच्या २१ सिलबंद पत्र्याचे टिन या मुद्देमालाची अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणेत यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

सही/–

दिनांक–०८.०६.२०२६.

[ जी.ए.कुलकर्णी ]

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ कुडाळ.